# University of Mumbai

## प्रसिध्दी पत्रक

### चीनमध्ये भारतीय अध्ययन केंद्र स्थापन व्हावे - चीनचे शिक्षणमंत्री हाओ पिंग यांची इच्छा.

मुंबई - चीनमधील विद्यार्थ्यांना भारताविषयी उत्सुकता आहे. शिक्षणाच्या माध्यमातून दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ होतील. यासाठी चीनमध्ये भारतीय अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठाच्या सहाकार्याने सुरू व्हावे, अशी इच्छा चीनचे शिक्षणमंत्री हाओ पिंग यांनी व्यक्त केली. त्यांनी मुंबई विद्यापीठास सदिच्छा भेट दिली, त्यावेळेस ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, या अध्ययन केंद्रामार्फत चीनमधील विद्यार्थी भारतीय भाषा, संस्कृती व इतर आधुनिक अभ्यासक्रमाचे अध्ययन करतील तसेच चीनी विद्यार्थी भारतात येवून व भारतातील विद्यार्थी चीनमध्ये जाऊन अभ्यास करतील, असे अध्ययन केंद्र स्थापन करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने पुढाकार घ्यावा असेही ते म्हणाले.

याप्रंसगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजन वेळुकर म्हणाले की, दोन देशादरम्यान काही अल्प मुदतीचे अभ्यासक्रम माहिती व तंत्रज्ञान, व्यवस्थापन व इतर नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करून यामार्फत विद्यार्थी व शिक्षक यांची देवाणघेवाण करण्यात येईल. दोन देशादरम्यान संशोधनाचे प्रकल्प राबविले जातील.

याप्रंसगी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. नरेश चंद्र म्हणाले की, सध्या मुंबई विद्यापीठाचे चीनमधील तीन विद्यापीठादरम्यान सहकार्याचे करार करण्यात आलेले आहेत याचाच एक भाग म्हणून चीनमधील तियानजेन नॉर्मल विद्यापीठातील शिक्षकांनी नुकतेच 'मॅन्डरीन' या चीनीभाषेचे प्रशिक्षण गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था, बिर्ला महाविद्यालय व डहाणूकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आले.

यावेळी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. राजपाल हांडे यांनी मुंबई विद्यापीठ व चीनमधील विद्यापीठादरम्यानच्या सहकार्य संबंधाच्या माहितीचे सादरीकरण केले व कन्फ्युशियस तत्वज्ञान केंद्र स्थापन करण्याविषयीचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे सांगितले. चीनचे शिक्षणमंत्री हाओ पिंग यांच्या शिष्टमंडळात झाहोग बिंगलिन, क्युन चांगवुई, चेन डाली, हुवांग जिगांग व मुंबईतील चीनचे कॉन्सील जनरल न्यूकिंग बाओ हे यांच्या समवेत होते.

या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव श्री. कुमार खैरे हे उपस्थित होते.